विश्व् मराठी नाट्य् संमेलन - एक निरिक्षण

पहिले विश्व् मराठी नाट्य् संमेलन २९-३१ मे ला न्यू जर्सीत झाले. ही घटना आता जुनी झाली. पण त्या निमित्याने, मला मराठी रंगभूमी बद्दल् माझे विचार मांडायचे आहेत. आशा आहे की इतर लोकही ह्यातील मुद्यांवर त्यांचे विचार् व्यक्त करतील.

नेहेमी प्रमाणे, या संमेलनातही अचानक् अडचणी आल्या: सभागृहाची जागा बदलावी लागली, ऐन वेळी कलाकारांना व्हिसा मिळाला नाही, इत्यादि. या उलट उपस्थितांची माफक संख्या व जेवणाची स्वतंत्र व्यवस्था ह्यामुळे आयोजकांवरील भार थोडा कमी झाला होता. एकंदरीत, कार्यक्रम यशस्वी झाला असे वाटले. यशाचे श्रेय नेरुरकर दांपत्य व त्यांच्या अगणित सहकाऱ्यांना आहे. नेहेमी प्रमाणे हुकुमशाही व यश विभागणीतील विषमते बद्दल कुरकुर ऐकली. पण यशस्वी नेतृत्वाचा तो एक भाग आहे असे माझे मत आहे.

पहिल्या दिवशी, शिकागोतील एकांकिका स्पर्धेतील पहिल्या तीन् विजेत्या एकांकिका सादर केल्या गेल्या. आपल्याला अभिमानाची गोष्ट आहे की न्यु जर्सीच्या थिऎट्रिक्सने सादर केलेली एकांकिका "मुक्तीधाम" अंतीम विजेती ठरली. अनुभवी कलाकारांनी ती एकांकिका जवळजवळ् निर्दोषपणे सादर केली ह्यांत वाद नाही. पण् तिचा विषयच् मला इतका नावडता आहे की मी तिच्याकडे निरपेक्षपणे बघू शकलो नाही. नटसम्राट् आणि मित्र ह्या प्रसिद्ध नाटकांप्रमाणे ही एकांकिका सुद्धा वृद्धाबद्दल वृद्धांनी वृद्धांसाठी लिहिली आहे असे मला वाटते. वृद्धा पिढी म्हणजे त्यागमूर्ती आणि तरुण पिढी म्हणजे उथळ्, स्वार्थी, सुखलोलुप, कृतघ्न, वगैरे, हे गृहीत्!! माझ्या कितीतरी मित्रांना मी त्यांच्या आईवडीलांच्या स्वास्थासाठी धडपडतांना बघत् आलो आहे. त्यांचे प्रतिबिंब कुठेच दिसत नाही. ह्या विषयावर् इतरांचे काय् मत् आहे ह्याचे मला कुतुहल आहे. संदीप करंजकरचे काम अनपेक्षितपणे उठावदार वाटले. तसेच, सुधीर कुळकर्णीने त्याच्या रोलला आणलेली भावनाशिलता जास्त सुसंगत वाटली. मकरंदची अभिनयकला पुन्हा काहीशा अजोड रोलवर खर्च झालेली बघून वाईट वाटले. आशुतोष हडपने त्या रोलला पाहिजे ती अधीरता किंवा उध्दटपणा आणला असता असे वाटले.

निळाई आणि पिसारा ही दुसऱ्या क्रमांकाची नाविन्यपूर्ण एकांकिका फार आवडली. तिच्या विषयाचा धीटपणा आणि त्यावर मात करणारे संवाद ह्यामुळे मनाला जिंकून गेली. कलाकारांच्या तारुण्यसुलभ जिवंतपणाच्या धबधब्यामुळे जिवनाबद्दलची अधीरता आणि बेफिकीर आपोआपच प्रतीत होत होती. त्यामुळे, नायिका वगळल्यास, इतरांच्या अभिनयातील कमतरता बरीचशी भरून निघत् होती. मात्र बहुतेकांना शरीरसंबंधाचा अनुभव नसावा असे जाणवत होते. ती एकतर वस्तुस्थिती असेल किंवा प्रेक्षकांचे सर्वसाधारण वय लक्षात घेऊन अभिनयाला मुद्दाम घातलेली मुरडही असेल. ह्या

एकांकिकेच्या लेखिका-दिग्दर्शिका-अभिनेत्री सारखे कलाकार नव्या पिढीत वर येताहेत त्यावरून् ह्या देशातही मराठी रंगभूमीचे भविष्य उज्वल आहे असा मला विश्वास वाटतो. परिक्षकात तरूण व्यक्ति असत्या तर ह्या एकांकिकेचा पहिला नंबर आला असता का असा विचार येऊन गेला. हा विषय आपल्या नवीन पिढीसाठी महत्वाचा असला तरी लोकांना तो कितपत मानवला ह्या बद्दल मला कुतुहल आहे.

दुसऱ्या दिवशी यू टर्न हे नाटक सुध्दा तसेच मनाला चटका लावून गेले. ह्यात् इला भाटेने एमा थॉमसन किंवा मेरील स्ट्रीप च्या तोडीचे काम केले आहे. रंगभूमीवर आल्याआल्या ती नाईकेचा आत्मविश्वास आणि लोकांच्या चांगुलपणा वरील नितांत श्रध्दा स्थापित करते. कथानक माहिती नसल्याने वेळोवेळी ते नेहेमीच्या मार्गावर घसरणार अशी शंका यायची. पण दर वेळी कथानक अनपेक्षित वळण घेत होते. नाटकाचा शेवट सुध्दा कलात्मक आहे. आणि इलाने नाईकेच्या मनातील त्या क्षणीची घालमेल उत्कटतेने चितारली आहे. तिच्या तुलनेने गिरीश ओकांचा अभिनय कमी पडला असे वाटले. सुरवातीला शिस्तबध्द व्यक्तिचा तुटकपणा त्यांनी चांगला व्यक्त केला पण पुढे त्याखालील सहृदय पुरूष पुरेसा व्यक्त झाला नाही असे वाटले. तसेच, निळाई आणि पिसारा एकांकिके प्रमाणे, इथेही शरीरसंबंध हा विषय टाळण्याच्या प्रयत्नात, थोडीशी कृत्रिमता आली आहे. पण इला भाटेचा अभिनय तो दोष बहुतांशी झाकून टाकतो. ही उणिव इतर कोणाला जाणवली का याबद्दल मला कुतुहल् आहे.

बेगम बर्वे मधे चंद्रकांत काळ्यांचे काम अफलातून रंगले. स्त्री पात्र म्हणजे कै. बाल गंधर्व या समिकरणामुळे काही लोकांना हे नाटक कळले नसावे अशी मला शंका आहे. त्यांनी "जोगवा" हा अतिशय प्रभावी मराठी चित्रपट जरूर पहावा.

पूर्णविराम करण्यापूर्वी मानसी करंदीकरच्या नृत्यवृंदाने सादर केलेला नाविन्यपूर्ण कार्यक्रम नमूद करणे आवश्यक आहे. लावणीचा इतर नृत्य प्रकारांशी संगम नयनरम्य वाटला.

शरद साठे